**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासकीय व शासन अनुदानित/व्यावसायिक व बिगर व्यावसायिक संस्थेचे शुल्क ठरविणे व गुणवत्तेवर आधारित प्रवेश देणे याबाबत नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण शुल्क समिती व प्रवेश नियंत्रण समिती स्थापना करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

शासन निर्णय, क्रमांक : युएसजी २००३/(८५/०३)/विशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २४ सप्टेंबर, २००३

वाचा:-१) शासन निर्णय क्रमांक :युएसजी २००३/(३३/०३)/१/विशि-४, दिनांक १६ एप्रिल, २००३

२) शासन परीपत्रक क्रमांक :युएसजी २००३ /(४०/०३)/विशि-४, दिनांक २९ मे, २००३.

३) शासन शुध्दीपत्रक क्रमांक : युएसजी २००३/(४०/०३)/विशि-४, दिनांक १० जून, २००३.

४) शासन शुध्दीपत्रक क्र. युएसजी २००३/(३३/०३)/विशि-४, दि.२६.६.०३

**प्रस्तावना** : टी. एम. ए. पै फौन्डेशन व इतर विरुध्द कर्नाटक राज्य व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्रमांक : ३१७/१९९३ मध्ये न्यायालयाने दिनांक ३१.१०.२००२ रोजी दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन दिनांक १६.४.२००३ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. या निर्णयाला आव्हान देणा-या याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केल्या होत्या. त्याचवेळी कर्नाटक सरकार व केरळ सरकार यांच्या विरुध्द सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याच विषयांच्या अर्जावर सुनावणी झाली.सर्वोच्च न्यायालयाकडून याचिका क्रमांक ३५० / ९३ मध्ये महाराष्ट्र राज्यातील जे अर्जदार होते, त्यांचे अर्ज न स्वीकारता ते मुंबई उच्च न्यायालयाकडे दिनांक १४.८.२००३ रोजी दिलेल्या निकालानुसार पुढील सुनावणीकरिता वर्ग करण्यात आले . या निर्णयाच्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ३०६१/२००३ व इतर प्रकरणी दिनांक २३.८.२००३ रोजी दिलेल्या निर्देशानुसार या विभागाअंतगर्त शासकीय व शासन अनुदानित व्यावसायिक व बिगर व्यावसायिक शैक्षणिक संस्थामधून शिक्षण शुल्क पुनर्रचना व त्या अनुषंगाने शिक्षण शुल्कात द्यावयाच्या सवलतीबाबतचा प्रस्ताव दिनांक २६.८.२००३ च्या मंत्रीमंडळ बैठकीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आला. सदरहू मंत्रीमंडळ बैठकीत शिक्षण शुल्क ठरविण्यासाठी शिक्षण शुल्क समिती व प्रवेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रवेश नियंत्रण समिती अशा दोन समित्या स्थापने करण्यास मान्यता दिली आहे .

**शासन निर्णय** :राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण व वैद्यकीय शिक्षण विभागाअंतर्गत येणा-या सर्व खाजगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षण शुल्क ठरविणे व गुणत्तेवर आधारित प्रवेशाबाबत नियंत्रण ठेवण्यासाठी **शिक्षण शुल्क समिती व प्रवेश नियंत्रण समिती** अशा दोन समित्या स्थापन करण्यात येत आहेत. .

(१) **समित्यांची रचना**

सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.८.२००३ रोजी दिलेल्या निकालानुसार वरील दोन समित्या स्थापन करण्यात येत असून त्या प्रत्येक समितीचे अध्यक्ष उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश असतील व त्यांची नेमणूक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश करतील .

प्रत्येक समितीत अध्यक्षासह ५ चा पेक्षा जास्त सदस्य असू नयेत . इतर सदस्यांची नावे त्या-त्या समितीचे अध्यक्ष सुचवितील . हे सदस्य खालील प्रमाणे असतील :-

**अ) प्रवेश शूल्क समिती** :- चार्टट अकौटन्ट / मेडिकल कौसील ऑफ इंडियाचे प्रतिनीधी किंवा ऑल इंडिया कौसील ऑफ टेक्निकल एज्युकेशन चे प्रतिनीधी अशा तंज्ञ व्यक्तीमधून सदस्यांची नियुक्ती केली जाईल.

**ब) प्रवेश नियंत्रण समिती :-** वैद्यकीय /अभियांत्रिकी / तांत्रिक / शैक्षणिक क्षेत्रातील तंज्ञ व्यक्ती सदस्य असतील त्यापैकी १ सदस्य विद्यापीठाचे कुलगुरु असावेत.

या दोन्ही समित्यांच्याकरीता सचिव पदी भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी पूर्ण वेळेकरिता नियुक्त करण्यात येईल.

समित्यांचे मुख्यालय मुंबई येथे असेल व त्यासाठी लागणारी यंत्रणा समित्यांच्या अध्यक्षांबरोबर चर्चा करुन ठरविण्यात येईल .सध्या आयराचे कार्यालय जेथे कार्यरत आहे त्याच ठिकाणी म्हणजेच शासकीय विधी महाविद्यालय , चर्चगेट, मुंबई येथे सुरु करण्यात येईल. व आयरासाठी दिलेला कर्मचारी वर्ग या समित्यांच्या कार्यालयासाठी ताबडतोब उपलब्ध करुन देण्यात येईल.

(२) **समितीच्या अटी व शर्ती :-** प्रत्येक समितीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे असतील

१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (अध्यक्ष व सदस्यांच्या सेवाशर्ती ) नियम २००० अन्वये लागू करण्यात आलेल्या अटी व शर्ती समितीच्या अध्यक्षांना लागू राहतील. अध्यक्ष पदावरील नियुक्ती सुरुवातीला एक वर्षाकरिता राहील व हा कालावधी आवश्यकतेनुसार वाढविण्यात येईल .

२) या समितीवर नेमणूक केलेले सदस्य अंशकालीन असल्याने त्यांना प्रत्येक बैठकीकरिता बैठक भत्ता रु. १०००/- या दराने दिला जाईल. तसेच त्यांना त्यांच्या दर्जानुसार अनुज्ञेय प्रवासभत्ता व दैनिकभत्ता दिला जाईल. सुरुवातीस प्रत्येक सदस्यांची नियुक्ती एक वर्षाकरिता राहील व हा कालावधी आवश्यकतेनुसार वाढविण्यात येईल .

(३) **समित्यांची कार्यकक्षा** :- प्रत्येक समितीचे कार्यक्षेत्र राज्यातील अकृषि विद्यापीठे त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये / संस्था, अभिमत विद्यापीठे व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ इत्यादींनी ठरविलेले शुल्क प्रमाणित करणे व प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे .

समितीच्या बैठका विद्यापीठनिहाय आयोजित केल्या जातील व त्यासाठी संबंधीत विद्यापीठामध्ये तशी व्यवस्था करण्यात येईल.

(४) **समित्यांच्या जबाबदा-या**

**(अ)शिक्षण शूल्क समिती :-**

(१) राज्यातील अकृषि विद्यापीठे क्षेत्रातील प्रत्येक अनुदानित/ विनाअनुदानित शिक्षण संस्थांतील प्रत्येक अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क लागू करण्यासंबंधी सूत्र तयार करणे,

(२) त्यासाठी प्रत्येक संस्थेची स्थापना, कार्यक्षेत्र , राबविण्यात येणारे अभ्यासक्रम, अभ्यासक्रमाचा कालावधी, विद्यार्थी संख्या व त्यावर संबंधित आयोगाने (यु.जी.सी./ ए. आय. सी. टी. ई./एम.सीआय इत्यादी ) घालून दिलेले निकष यांची माहिती प्राप्त करुन घेणे,

(३) शैक्षणिक अभ्यासक्रम राबविण्याच्या पध्दती, कार्यभार व त्यावरील नियुक्त्या, परीक्षा पध्दती व त्यावरील खर्चाची माहिती घेणे व पुढील ५ वर्षातील संस्थेच्या विकासात्मक कार्याची माहिती घेणे.

(४) अभ्यासक्रमाच्या शुल्काचे सूत्र ठरविणे व त्याला प्रसिध्दी देणे.

(५) संस्थांनी अभ्यासक्रम सूत्रानुसार ठरविलेले शुल्काचे प्रस्ताव हे सूत्राप्रमाणे व संस्थेने दिलेल्या माहितीनुसार आहेत किंवा कसे हे तपासून एक महिन्याचे आत ते प्रमाणित करणे.

(६) शैक्षणिक संस्थांचे शुल्क नियमन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीकडून शैक्षणिक संस्थांनी आपल्या सर्व अभ्यासक्रमांसाठी आकरण्यांत येणा-या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

(७) शुल्क प्रमाणित करताना संस्थेकडून उपलब्ध झालेली माहिती व प्रत्यक्ष महाविद्यालयात आढळून आलेली परिस्थिती यात तफावत या संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास प्रत्यक्ष पाहणी करुन तपासून घेणे व त्यात योग्य ते बदल करणे. मात्र तक्रार निवारण करावयाचे असल्यास ते अधिकार शासनाकडे असतील.

(८) संस्थांनी ठरविलेली व समितीने प्रमाणित केलेल्या शुल्काची अंमलबजावणी संस्थांनी करुन त्याचा अहवाल शासनास , विद्यापीठास, संबंधित आयोगास (यु.जी.सी./ ए.आय.सी.टी.ई / एम.सीआय. इत्यादि) यांना कळविल्याची खात्री करणे व एक प्रत समितीकडे ठेवणे

(९) समितीने प्रमाणित केलेले शुल्क हे अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठीच लागू राहिल. त्यानंतर पुढील कालावधीसाठी हे शुल्क परत प्रमाणित करुन घ्यावे लागेल.

(ब) प्रवेश नियंत्रण समिती :

१) संस्थेने घेतलेल्या प्रवेश परीक्षेवर समिती लक्ष ठेवील .

२) प्रवेश प्रक्रियेची परीक्षा योग्य आणि पारदर्शक पध्दतीने पार पाडली जात आहे . याची समिती खात्री करेल आणि प्रवेश प्रक्रियेचे पर्यवेक्षण करील.

३) आवश्यकता भासल्यास प्रवेश परीक्षेची प्रश्न पत्रिका न फुटल्याबाबतची खातरजमा करण्यासाठी प्रश्नपत्रिका / प्रश्नपत्रिका तयार करण्या-यांची नावे / उत्तर पत्रिका तपासणा-यांची नावे आणि परीक्षेची कार्यपध्दतीबाबतची माहिती संस्थेकडून मागविण्याचे अधिकार समितीला राहतील.

४) ज्या संस्थांची स्वतःची प्रवेशाबाबतची कार्यपध्दती ठरलेली आहे अशा संस्थांना त्यापध्दतीने प्रवेश देण्यास समिती मान्यता देऊ शकेल. ही प्रवेश पध्दती कमीत-कमी २५ वर्ष चालू ठेवता येईल.

५) प्रवेशाबाबत अल्पसंख्यांक संस्थेची गरज योग्य आहे असे समितीस वाटल्यास समिती संस्थेला शासनाने ठरवून दिलेल्या जातीच्या कोटयापेक्षा जास्त जागा भरण्याची अनुमती देवू शकेले.

६) एकाद्या संस्थेला प्रवेश नियंत्रण समितीमधून सूट द्यावयाची असल्यास किंवा एकाद्या संस्थेच्या प्रवेश टक्केवारीमध्ये बदल करावयाचा असल्यास शासनाला समितीपुढे आपले म्हणणे मांडणे आवश्यक राहील.

## (५) शिक्षण शुल्क समितीने आकारावयाचे सेवाशुल्क:

सदर समित्यांकडे राज्यातील नोंदणीकृत संस्थांनी महाविद्यालय निहाय नोंदणी करुन घ्यावी. शुल्क प्रमाणित करतांना समित्यांतर्फे खालील प्रमाणे सेवा शुल्क आकारण्यात येईल :-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बिगर व्यावसायिक पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रम | विद्याशाखा निहाय | प्रत्येकी रुपये १० हजार |
| २ | व्यावसायिक - वैद्यकीय /अभियांत्रिकी पदवी/ पदविका / पदव्युत्तर व इतर अभ्यासक्रम | अभ्यासक्रमनिहाय | प्रत्येकी रुपये १० हजार |
| ३ | पदवी/ पदव्युत्तर व्यवस्थापन शास्त्र | अभ्यासक्रमनिहाय | प्रत्येकी रुपये २० हजार |

## (६) विदेशी व इतर राज्यातील अभ्यासक्रमांची नोंदणी व प्रमाणिकरण

गॅट कराराच्या पार्श्वभूमीवर परदेशातून महाराष्ट्रामध्ये येणा-या संस्था व विद्यापीठे यांचे अभ्यासक्रम राज्यात सुरु करण्यापूर्वी त्यांनी उपरोक्त दोन्ही समित्याकडे संस्था व अभ्यासक्रमासंबंधीची सर्व माहिती देऊन नोंदणी करुन घ्यावी. मात्र शिक्षण शुल्क समितीचे शूल्क सूत्र परदेशी व इतर राज्यातील अभ्यासक्रमांसाठी लागू राहणार नाही. त्यासाठी समिती खालील प्रमाणे सेवाशुल्क आकारील.

**समितीने आकारावयाचे सेवा शुल्क**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | विदेशी संस्था/ विद्यापीठे | अभ्यासक्रम निहाय | रुपये ३ लाख |
| २ | इतर राज्यांसाठी | अभ्यासक्रमनिहाय | रुपये १ लाख |

७) **इतर मुद्दे**

* समितीकडे उपलब्ध होणा-या सेवा शुल्काच्या रक्कमेतून समितीचा खर्च भागविण्यात येईल.
- ◆ शैक्षणिक शुल्क व प्रवेश नियंत्रण समित्यांच्या कामकाजासंबंधी कोणत्याही वेळी बदलत्या परिस्थितीनुसार कोणतीही सुधारणा करणे, नियंत्रण करणे व गरजेनुसार संबंधित जबाबदा-या देण्याचे अधिकार शासनाकडे राहतील
- ◆ शैक्षणिक शुल्क व प्रवेश नियंत्रण समित्यांकडे संस्थांकडून प्राप्त झालेला निधी व झालेल्या खर्चाचे लेखा परीक्षण महालेखाकार यांचे कार्यालयाकडून केले जाईल.
- ◆ या संदर्भातील महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मध्ये यशावकाश सुधारणा करण्यात येईल.
- ◆ समितीने प्रमाणित केलेले शैक्षणिक शुल्क सन २००३-२००४ च्या शैक्षणिक वर्षापासून अंमलांत येईल.

) या शासन निर्णयानुसार स्थापन करण्यात आलेल्या समित्या प्रत्यक्षात अस्तित्वात आल्यानंतर र्भाधीन अनुक्रमांक १ ते ४ अन्वयें निर्माण करण्यात आलेली सर्व शैक्षणिक संस्था विनियमन प्राधिकरणे करण्यात यावीत व त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणे नवीन समित्यांकडे वर्ग करण्यात यावीत .

) समित्यांचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीबाबतचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

प्रस्तुत आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ११८३ / ा-५ , दिनांक २६.८.२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( अ.मा. भट्टलवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

मा. कुलपती व राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, (व्यवसाय शिक्षण) ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, ( कला ) , महाराष्ट्र राज्य, मुंबई,
मा. कुलगुरु, सर्व विद्यापीठे,
मा. कुलसचिव, सर्व विद्यापीठे,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
ाहालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

१४. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
१५. मा. मंत्र्यांचे /राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
१६. मा.मुख्यसचिव यांचे अवर सचिव,
१७. सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. प्रधान सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१. सचिव , आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. सर्व मंत्रालयीन विभाग
२३. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने,
२४. निवड नस्ती विशि-४

D:\Padma\G R\Vishi ४\EIRA-१.doc